N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** वेदांत नगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0015 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**28/01/2025 23:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/01/2025
**Time From (वेळेपासून):** 16:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/01/2025 **Time (वेळ):** 23:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/01/2025 23:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** युनूस चाँद शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 31/32,बिड बायपास रोड,तापडीया कम्प्लेक्स समोर,अलिशान नगर, छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 31/32,बिड बायपास रोड,तापडीया कम्प्लेक्स समोर,अलिशान नगर,वेदांत नगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9325177777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रायबा भगवान पाटील | | | 1. ऑफिसर्स क्वटर्स,पदमपुरा फायर ब्रिगेड स्टेशन,वेदांत नगर, छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | वैभव विजयराव बाकडे | | | 1. 07, सेव्हन हिल फायर,ब्रिगेड स्टेशन,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू.दराच्या 14 नोटा | 7,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी युनूस चाँद शेख, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती, रा. प्लॉट नं. 31/32, बिड बायपास रोड, तापडीया कॉम्प्लेक्स समोर, अलिशान नगर, छत्रपती संभाजीनगर. मोबा. 9325177777.

मी आज दिनांक 28/01/2025 रोजी श्री. अमोल धस, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे पंचासमक्ष तक्रार दिली की, " मी दिनांक 27/01/2024 रोजी सायंकाळी 05.30 वाचे सुमारास श्री. संदीप आटोळे, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना त्यांचे कक्षात भेटून पोलिस उपअधिक्षक श्री. सुरेश नाईकनवरे यांचे समक्ष माझी एका लोकसेवका विरुध्द पैसे मागत असले बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी आपणांस त्यांचे कक्षात बोलावून त्यांनी मला आपली पोलिस निरीक्षक अमोल धस अशी ओळख करून दिली व माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करण्यास सांगितलेने आपण मला त्यांचे कक्षातून बाहेर घेवून आलेवर मला तक्रारीबाबत विचारणा केली असता मी आपणांस उदया दिनांक 28/01/2025 रोजी मी फोन करून बोलावले ठिकाणी आलेवर मी तक्रार देतो असे सांगितले होते.

आज दिनांक 28/01/2025 रोजी मी बोलावलेले ठिकाणी कर्णपुरा मैदान, छत्रपती संभाजीनगर येथे आलेवर माझे तक्रारीबाबत दोन पंचासमक्ष विचारणा केली असता मी तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे पत्नी व मुलांसह राहत असून मी शेती, तसेच जागा खरेदी विक्रीचे काम करतो.

माझे नावे असलेली गट नं. 67, नारायणपुर बुद्रुक, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचा पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता मी दिनांक 23/09/2024 रोजी अग्निशमन विभाग महापालिका, छत्रपती संभाजीनगर चे पदमपुरा येथील कार्यालयात अर्ज सादर केला होता. सदर ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता मी कार्यालयातील कर्मचारी श्री. बाकडे यांना वेळोवेळी भेटून त्याचा पाठपुरावा करत होतो. परंतु मला त्यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही, त्यासाठी वेळ लागेल असे सांगितले. दिनांक 14/01/2025 रोजी फायर फंड व प्रोव्हिजनल फायर एन.ओ.सी. फिस चे एकून 15,583/- रूपये भरून त्याची पावती घेतली. तेव्हा मी श्री. बाकडे यांना प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी मला पंधरा दिवसानी या असे सांगितले. त्यानुसार मी दिनांक 27/01/2025 रोजी दुपारी 03.30 वाचे सुमारास अग्निशमन विभाग महापालिका,पदमपुरा येथील कार्यालयात जावून श्री बाकडे यांची भेट घेतली असता त्यांनी मला तुमचे काम होत आहे, मी पाटील साहेबांना बोललो आहे, आज पाटील साहेब बाहेर आहेत, तुम्ही दहा हजार रूपयांची तयारी ठेवा, तुम्ही उदया या, साहेबांना भेटून घ्या, असे सांगितले. पैसे दिल्याशिवाय माझे काम करणार नाहीत, मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे.

माझी व श्री. बाकडे , श्री. पाटील यांची पुर्वदुश्मनी किंवा देणे-घेणेचा अथवा उसनवारीचा व्यवहार नाही. आज दिनांक 28/01/2025 रोजी मी श्री. बाकडे, श्री. पाटील यांची अग्निशमन विभाग महापालिका,पदमपुरा येथील कार्यालयात जाऊन भेट घेऊन माझे पेट्रोल पंपाचे ना हरकत प्रमाणपत्राबाबत चर्चा करणार आहे. त्यावेळी श्री. बाकडे , श्री. पाटील यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी. मी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचे दिलेले पत्र, फायर फंड व प्रोव्हिजनल फायर एन.ओ.सी. फिस भरलेली पावती, माझे नावाचा सात बारा उतारा व माझे आधार कार्डची झेरॉक्सप्रत आपणाकडे हजर करीत आहे. माझी तक्रार माझे

सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन, प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 28/01/2025 रोजी श्री. बाकडे, श्री. पाटील हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. अतिष पाटील यांना अग्निशमन विभाग महापालिका,पदमपुरा येथील कार्यालयात श्री. बाकडे, श्री. पाटील यांचेकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/धस यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. अतिष पाटील यांना श्री. बाकडे, श्री. पाटील यांचेकडे अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा येथील कार्यालयात माझेकडील बलोनो कार क्र. MH 20-DV-4357 पाठवले. मी व पंच क्रमांक -1 श्री. अतिष पाटील असे तिसऱ्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात गेलो त्याठिकाणी माझी व श्री. बाकडे यांची भेट झाली भेटी दरम्यान माझे कामासंदर्भाने चर्चा झाली. माझे ना हरकत प्रमाणपत्र साहेबांचे टेबलवर असल्याचे मला सांगितले, व त्यासाठी दहा हजार रूपये दयावे लागतील असे म्हणाले त्यावर मी त्यांना दहा हजार रूपये जास्त होतात काही कमी करा असे म्हणालो असता त्यांनी पाटील साहेबांनीच सांगितले आहेत दहा हजार रूपये, असे मला सांगितले. मी त्यांना पाच हजार रूपये देतो असे म्हणालो असता त्यांनी मला तुम्ही श्री. पाटील साहेबांना भेटून घ्या, असे सांगितलेने मी पाटील साहेबांना भेटतो, माझे पैसे थोडेफार कमी होतील असे म्हणालो असता त्यांनी दुपारी तीन नंतर या, साहेब बाहेर गेले आहेत. असे सांगितलेने मी व पंच श्री. अतिष पाटील असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/धस, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. बाकडे यांनी 10000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे मान्य केले.

त्यानुसार पोनि/धस यांनी मला व दोन्ही पंचांना श्री. बाकडे यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले.पोनि/धस यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/धस यांनी सापळा कारवाईसाठी ॲंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/धस यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 10000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 20 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री. जावेद शेख यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास ॲंथ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/धस यांनी मला श्री. बाकडे व श्री. पाटील यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 10000/-रु. काढुन श्री. राऊत यांना द्याव्यात व त्यानंतर गळयात अडकवलेले पाढरे मोठे उपरणे (गमचा) डाव्या हातात घ्यावा असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. अतिष पाटील यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 10000/-रु. लाच रक्कम श्री. बाकडे यांना देण्यासाठी अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा येथील कार्यालयात रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/धस, पोअं. हिवाळे, पंच क्र. 2 श्री जावेद शेख असे सापळा पथकासह खाजगी मोटार सायकलने येत होते. मी व पंच क्रमांक 1 श्री. अतिष पाटील असे माझेकडील बलेनो कारने अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा येथील तिसऱ्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात गेलो. त्याठिकाणी श्री. बाकडे हे त्यांचे कक्षात नसलेने मी त्यांना फोन करून विचारले असता त्यांनी ते श्री. पाटील साहेबांचे कक्षात असल्याचे सांगून मला श्री. पाटील साहेबांचे कक्षात बोलावले. मी व पंच असे पाटील साहेबांचे कक्षात गेल्यावर तेथे श्री. बाकडे व श्री. पाटील साहेब होतें. मी श्री. पाटील साहेबांना उन्होने थोडासा जरा जादा बताऐ, दस हजार बताऐ, असे म्हणालेवर श्री. पाटील साहेब दस क्या जादा है क्या, ठिक है, जो है कर दो, देख लो बाहर जा के, ठिक है मैं अभी साईन कर देता, असे म्हणाले. मी व पंच श्री. अतिष पाटील असे कक्षाबाहेर येवून श्री. बाकडे यांचे कक्षात जावून बसलो. तेथे श्री. बाकडे यांनी मला पाटील साहेब काय म्हणाले असे विचारले असता मी, पाच हजार रूपये दयायला सांगितले असे म्हणालो असता श्री. बाकडे हे करा ॅफटाफट असे म्हणाले. मी त्यांना मैने तो पाच बोला था, म्हणालो असता त्यांनी दो मेरे करो, असे म्हणून दोन हजार रूपयांची मागणी केलेने मी त्यांना दोन्ही मिळून सात हजार रूपये देवू का असे विचारले असता श्री. बाकडे यांनी हो असे म्हणालेवर मी त्यांचे समोर सात हजार रूपये धरले असता त्यांनी ते पैसे घेवून मोजून त्यांचे अंगावरील घातलेल्या पॅंटचे उजवे खिशात ठेवून दिले. व मला माझे पेट्रोल पंपाकरीता आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र दिले. प्रमाणपत्र घेवून मी व पंच श्री. अतिष पाटील असे तिसऱ्या

मजल्यावरून खाली उतरत असतांना मी खाली दर्शनी भागात येताच लाच स्विकारल्या नंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 16.45 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/धस, पो.अंम. हिवाळे, सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक 2 श्री. जावेद शेख हे तात्काळ अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा येथील तिसऱ्या मजल्यावर असलेल्या कार्यालयात हजर आले. पोनि/धस यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/धस यांनी श्री. बाकडे यांना ताब्यात घेवून त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/धस यांनी पंच क्रमांक-1 श्री. अतिष पाटील यांना पंच क्रमांक 2 श्री. जावेद शेख यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक -1 श्री. अतिष पाटील यांनी सांगितले की, " श्री. पाटील साहेब यांनी सांगितलेप्रमाणे बाकडे यांनी माझ्याकडे पाटील साहेबांचे 5,000/- रूपये व त्यांचे स्वत: करीता 2,000/- रूपये असे एकून सात हजार रूपये लाचेची मागणी करुन 7,000/-रु. लाच रक्कम उजवे हाताने स्विकारुन स्वत:चे अंगावरील पँटचे उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे." असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री. अतिष पाटील यांनी केला. पोनि/धस यांनी श्री. बाकडे यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव वैभव विजयराव बाकडे, वय 38 वर्षे, प्रमुख अग्निशमन विमोचक, अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर, रा. क्वॉटर्स नं. 07, सेव्हन हिल फायर ब्रिगेड स्टेशन, छत्रपती संभाजीनगर, (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/धस यांनी श्री. बाकडे यांना 7000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी अंगावरील पँटचे उजवे बाजुचे खिशात ठेवली आहे असे सांगितले. पोनि/धस यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री. जावेद शेख यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमांक 2 श्री. जावेद शेख यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/धस यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/धस यांनी श्री. बाकडे यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी कागदपत्रे फाईल काढून दिलेने कागदपत्रांची फाईल ताब्यात घेतली. पोनि धस यांनी श्री. पाटील साहेबांबाबत श्री. बाकडे यांना विचारले असता त्यांनी ते त्यांचे कक्षात बसलेले असल्याचे सांगितले. पोनि धस यांनी श्री. पाटील साहेब यांचे कक्षात जावून त्यांची व सापळा पथकाची, पंचांची ओळख सांगुन घडलेल्या प्रकाराची माहीती देवून श्री. पाटील यांना त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव रायबा भगवान पाटील, वय 59 वर्षे, मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर, रा. ऑफिसर्स क्वॉटर्स, पदमपुरा फायर ब्रिगेड स्टेशन, छत्रपती संभाजीनगर, (कंत्राटी) असे सांगीतले. त्यानंतर पोनि/धस यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/धस, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आलोत. त्याबाबत दिनांक 28/01/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे. त्यांनतर पोनि/धस यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/धस यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे.

श्री. बाकडे यांनी माझे नावे असलेली गट नं. 67, नारायणपुर बुद्रुक, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचा पेट्रोलपंप सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता माझ्याकडे 10,000/-रुपये लाचेची मागणी केलेने मी श्री. पाटील साहेबांना भेटल्यावर त्यांनी सांगितलेवरून श्री. बाकडे यांनी पाटील साहेबांचे पाच हजार रूपये व त्यांचे स्वत:करीता दोन हजार रूपये असे एकून सात हजार रूपये लाच रक्कम दिनांक 28/01/2025 रोजी 16.43 वा. अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता, श्री. वैभव बाकडे यांना लाचेच्या रकमेसह पकडले आहे. म्हणुन माझी वैभव विजयराव बाकडे, वय 38 वर्षे, प्रमुख अग्निशमन विमोचक, अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर, व रायबा भगवान पाटील, वय 59 वर्षे, मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग महापालिका, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर खरी आहे. पोनि सो यांचे आदेशाने डिओ पोउपनि सुपे यांनी गुन्हा दाखल करून पुढील तपासकामी पोनि श्री. अमोल धस लाप्रवि छ.संभाजीनगर यांचेकडे दिले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

PRAVINA TARACHAND YADAV(I (Inspector)) / PI **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

FIR प्रत मिळाली.

PSI
ड्युटी ऑफीसर
पो.स्टे.वेदांतनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी**)**

**Name (**नाव**):** PRAVINA TARACHAN
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PI